अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्तः प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# भोंगळ-दिशाहीन रेल्वे अंदाजपत्रक

यंदाच्या अंतरिम रेल्वे अंदाजपत्रकात पुन्हा महाराष्ट्र मुंबईच्या तोंडाला पाने पुसली गेली आहेत. केवळ काही रेल्वे मार्गाच्या दुपदरीकरणाचे प्रस्ताव सोडले तर अंदाजपत्रकात कोणताही नवा प्रकल्प रेल्वे मंत्रालयाने मंजूर केलेला दिसत नाही. मुंबईत पश्चिम रेल्वेवर जुलैत एसी लोकल सुरू करण्याचे आश्वासन दिले गेले आहे. परंतु ते जेव्हा प्रत्यक्षात येईल तेव्हाच त्याच्यावर विश्वास ठेवता येईल. तोपर्यंत त्या सर्व हवेतल्या गप्पाच ठरतात. यंदाचे वर्ष निवडणूक वर्ष असल्याने सरकार लोकांना खुश करण्यासाठी विशेष सवलती देईल असे वाटले होते. तसेही झालेली नाही. प्रवासी भाड्यात रेल्वेने वाढ केलेली नाही. याचा अर्थ लोकांवर फार काही मोठे उपकार केलेले नाहीत. कारण निवडणुकांच्या तोंडावर भाडेवाढ करता येणार नाही हे माहीत असल्यामुळेच डिसेंबर महिन्यात रेल्वेने छुपी वाढ केली. रेल्वे अंदाजपत्रकापूर्वीच रेल्वे पासच्या दरातही वाढ केली गेली होती. म्हणूनच रेल्वे अंदाजपत्रक अंतरिम असले तर सध्याच्या यूपीए सरकारसाठी ते अंतिमच मानायला हवे. आज सर्व देशभर रेल्वेचे सर्वात मोठे जाळे आहे. २५ कोटी लोक आज रेल्वेच्या सेवेचा लाभ घेतात. जगातले एक मोठे रेल्वे नेटवर्क म्हणून भारताकडे पाहिले जाते. अशावेळी रेल्वेच्या अंदाजपत्रकाचा अधिक गंभीरपणे विचार व्हायला हवा. भारताच्या संवैधानिक व्यवस्थेमध्ये स्वतंत्र अंदाजपत्रक सादर करण्याचा मान फक्त रेल्वे मंत्रालयाला आहे. यावरून त्याचे महत्त्व आपोआपच अधोरेखीत होते. आज सामान्य प्रवाशाला हक्काची आणि स्वस्तातली प्रवासाची सुविधा फक्त रेल्वेमार्फतच उपलब्ध होते. अगदी देशाच्या सर्व प्रांतामध्ये रेल्वे जाळे निर्माण झाले आहे. आणि एकाच वेळी हजारो प्रवाशांना आपला इच्छित स्थळी, इच्छित काळी पोहोचण्याची खात्री रेल्वेमुळे उपलब्ध होते आणि म्हणून लाखो लोक रेल्वेने तीन-तीन महिने आधी आरक्षण करून आपल्या प्रवासाची योजना आखू शकतात. भारतातल्या पर्यटनाचा जरी विचार केला तरी आज केवढी मोठी सुविधा रेल्वेच्या माध्यमातून निर्माण झालेली आहे. भारतातल्या सर्वसामान्यांपासून ते असामान्य श्रीमंतांपर्यंत रेल्वेच्या सेवेचा उपयोग होतो. विशेष महत्त्वाचा भाग म्हणजे आज देशातील रेल्वेचा कोणताच मार्ग तोट्यात नाही. सर्व रेल्वे मार्ग रेल्वेला मोठा महसूल प्राप्त करून देतात. परंतु केवळ या व्यवस्थेत असलेली सरकारी कामकाजाची प्रवृत्ती रेल्वेसाठी तोट्याची किंवा नुकसानीची ठरली आहे. आतासुध्दा रेल्वे मंत्र्यांनी अंतरिम अंदाजपत्रक सादर करताना कोणताही कल्पकपणा दाखविलेला नाही. सरकारी कामकाजाचं पाटी टाकणारा आणि निवडणुकीवर डोळा असलेला हा अर्थसंकल्प रेल्वेच्या मार्गात अडथळा आणणार आहे असेच त्याचे वर्णन करावे लागेल

## उपकार केलेले नाहीत

केंद्रीय मंत्री मल्लिकार्जुन खरगे यांनी रेल्वेचे अंदाजपत्रक हे एक राष्ट्रीय महत्त्वाचे रेल्वे पत्रक आहे. हे ओळखलेलेच दिसत नाही. आपण रेल्वेच्या भाड्यात वाढ न करणारे सामान्य माणसाला दिलासा देणारे अंदाजपत्रक सादर करीत असल्याचे अभिमानाने सांगितले. परंतु आज त्याच सामान्य रेल्वे प्रवाशाला रेल्वे नेमक्या काय सुविधा देणे. याचाही विचार केला पाहिजे. रेल्वे सामान्य माणसांसाठी उपयुक्त आहे. आज रेल्वेशिवाय सामान्य माणसाकडे दुसरा पर्याय नाही, अशा स्थितीत अनेक गोष्टी रेल्वे प्रवासी सहन करीत असतो. याचा अर्थ आज रेल्वे प्रवाशांकडून जे भाडे वसूल करते ते काही अगदीच कमी नाही. प्रवाशांना मिळणाऱ्या सोयी-सुविधांशी जर त्या भाड्याची तुलना केली तर हे भाडे जास्तच आहे असे वाटायला लागते. आज ग्रामीण भागातून जाणारे रेल्वे मार्ग दुर्लक्षित आहेत. २५-३० वर्षे होऊन त्यात सुधारणा नाही, गाड्यांच्या डब्यांमध्ये जुनाटपणा आहे. रेल्वे स्थानके म्हणजे निर्वासितांची संक्रमण शिबिरे आहेत की काय असे तिथले चित्र असते. ते बदण्यासाठी एका कल्पक रेल्वे मंत्र्यांची देशाला गरज आहे आणि तितकीच मोठी राजकीय इच्छाशक्ती असलेल्या राजकीय पक्षाचीही आवश्यकता आहे. या दोन्ही गोष्टी नसल्यामुळे रेल्वेच्या विकासाची गती खूपच मंद असल्याचे सहजपणे लक्षात येते.

## मुंबईवर अन्याय

रेल्वेच्या मंद कारभाराचे ज्वलंत उदाहरण म्हणजे मुंबईचे देता येईल. गेली ८ वर्षे सुरू असलेला मेट्रो रेल्वे प्रकल्प अद्याप सुरू झालेला नाही तर मुंबईतली उपनगरीय रेल्वे सेवा कार्यक्षम किंवा जागतिक दर्जाची करायचीच नाही, असा ठाम निर्धार रेल्वे मंत्रालयाने केलेला दिसून येतो. आज मुंबईला जागतिक दर्जाचे शहर बनविण्यासाठी वेगवेगळ्या घोषणा केल्या जातात. परंतु सामान्य मुंबईकरांच्या रोजच्या जीवनात जीवनवाहिनी असलेली उपनगरी रेल्वे सुधारलेली नाही. आज दहा हजार कोटी खर्चून नवे आंतरराष्ट्रीय विमानतळ उभे राहिले जगाच्या तुलनेत हे विमानतळ अव्वल दर्जाचे असल्याचे मोठ्या अभिमानाने सांगितले जात आहे. श्रीमंतांसाठी सर्व सरकारी योजना वेगाने पूर्ण होतात, त्याचे उद्घाटन करायला पंतप्रधान स्वतः हजेरी लावतात. नवे कोरे विमानतळ एवढे चकाचक आहे की, परदेशी पर्यटकांना तोंडात बोटे घालावीत असे त्याचे देखणे रूप दिले गेले आहे. पण असे देखणे रूप मुंबईतल्या एकाही रेल्वे स्थानकाला मिळालेले नाही. कारण या रेल्वे स्थानकात सामान्य माणूस असतो तो रोजच्या रोजीरोटीसाठी धावपळ करीत असतो. त्याला दिलासा देण्याचे काम सरकार करीत नाही. श्रीमंतांसाठी, पैसेवाल्यांसाठी धावणारे हे सरकार सामान्यांच्या उपनगरीय रेल्वेसाठी एवढे व्याकुळ होत नाही. एसी लोकल सुरू करण्यामागेदेखील श्रीमंतांचा सरकारला जास्त पुळका आहे हे सिद्ध होते. जिथे साधी लोकल नीट धावत नाही तिथले पंखे नीट फिरत नाही तिथे एसी लोकलचे प्रदर्शन दाखविण्याची गरज नाही. आज मुंबईसाठी रेल्वे अंदाजपत्रकात पूर्ण दुर्लक्ष केले गेले असे म्हटले तरी चालेल कारण आज मुंबईच्या गर्दीचा विचार केला तर आधुनिक रेल्वे सेवा आवश्यक आहे. स्वच्छ रेल्वे स्थानके मुंबईची निकड आहे आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून रेल्वे स्थानकांवर लागणाऱ्या रांगा कायमच्या थांबविण्याची सोय रेल्वेने केली पाहिजे. रेल्वेला आधुनिकतेचे वावडे दिसते आणि म्हणूनच मुंबईसारख्या आधुनिक नगरीतसुद्धा अत्याधुनिक रेल्वेसेवा देण्यात रेल्वे मंत्रालय अयशस्वी ठरले आहे. यावरून यावेळचे रेल्वे अंदाजपत्रक भोंगळ आणि दिशाहीन ठरले आहे.